# BDC LIBRARY
## New Paper Clipping
*A.Y. 2024-2025*

# जमीला मुलाणी यांना 'कोयनारत्न' पुरस्कार

कराड : कराड तालुका शिक्षण विस्तार अधिकारी जमीला उस्मान मुलाणी यांना कोयना एज्युकेशन सोसायटी व माजी विद्यार्थी संघ, पाटणतर्फे दिला जाणारा 'कोयनारत्न' पुरस्कार बाळासाहेब देसाई कॉलेज, पाटण येथे माजी विद्यार्थी स्नेह मेळाव्यात प्रदान करण्यात आला. यावेळी जमीला मुलाणी यांच्यासह मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले. जमीला मुलाणी यांच्या शैक्षणिक कार्याचा यावेळी गौरव करण्यात आला. कार्यक्रमास माजी मुख्याध्यापक उस्मान मुलाणी, माजी मुख्याध्यापिका मदिना मुलाणी, प्राचार्य डॉ. शिरीषकुमार पवार, डॉ. हेमलता काटे, प्रा. डॉ. विलासराव कुळंत्रे, प्रा. डॉ. पांडुरंग ऐवळे, माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष ॲड. बाबुराव शेळके, विविध क्षेत्रांतील मान्यवर, हितचिंतक उपस्थित होते.